FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि, पहिली खबर क्र. FIR No. ०५, वर्ष Year २०२३, दिनांक Date ०१/०२/२३

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधि १९८८, कलमे Sections ७
 (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
 (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day मंगळवार, तारीख पासून Date from ३१/०१/२३, वेळ Time १३:०० वा, तारीख पर्यंत Date to ०१/०२/२३, वेळ Time १२:५८ वा

 वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
 (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
 (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

 (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date ..........., वेळ Time ...........

 (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ..........., तारीख Date ०१/०२/२०२३, वेळ Time ...........

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ७ कि.मी. दक्षिणेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. –

 (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ~~रुस्तम शोचालयाचे~~ ठिकाणीचे नाव if any सिमेंट हॉटेल समोर, कल्याण स्ट्रिट, गल्ली Ward ..........., रस्त्याचे नाव Name of road ...........
 जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place मस्जिद बंदर, Village मुंबई ०९, पोस्ट Post ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........

 (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
 (a) नाव Name मोहम्मद लुकमान (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name अनिस अहमद
 (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३० वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९५९५२८९५००
 (e) पारपत्र क्रमांक Passport No. – दिल्याचा दिनांक Date of Issue – दिल्याचे ठिकाण Place of Issue – (f) व्यवसाय Occupation हातमाग व्यवसायिक
 (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
 (h) पत्ता : Address : ........... गल्ली / सर्वे नं. Ward ........... घर / नाव नंबर House/Name No. ........... फोन /मो. नंबर Phone/M. No. ........... पॅन नं. Pan No. ........... वोटर्स नं. Card No. ...........
 रस्त्याचे नाव Road ........... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ७५४३, लखापुरा, Village गल्ली Post नं 11, पो.स्टे. P. Stn. मालेगाव
 तालुका Taluka ........... जिल्हा Distt. नाशिक राज्य State ........... सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
 Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
 अजीतकुमार राजाभाऊ सासवडे, वय ५७, पद-नोकरी-प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, रा.ठि. बी-१०/४, शासकीय वसाहत, हनुमान मंदीर जवळ, बांद्रा (पु), मुं. ५१
 मो. ९८६९३४१९६२.

क

फिर्यादी यांचा स्वतंत्र पानावर घेण्यात आलेला जबाब
हाच गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात
येत आहे

समक्ष

पंकज शिंदे
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि मुंबई.

फिर्याद दिनांक – ०१/०२/२०२३

श्री. मोहम्मद लुकमान अनिस अहमद, वय ३१ वर्ष, धंदा – इलेक्ट्रीक इजिनिअर, रा.ठि.– ७५३, लाईन न. ११, अगंनुशेट मस्जिदजवळ, नयापुरा, मालेगाव, जि. नाशिक, मो.क्र. ९५९५२८१७००, आधार कार्ड क्र. ७१९३१८४२१३९५

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझ्या कुंटुबियासोबत जन्मापासून राहत आहे. मी इलेक्ट्रीक इंजिनिअर असल्यामुळे लाईटची कामे करून मिळणाऱ्या उत्पन्नामधून माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. तसेच आमच्या कुंटुबाचा पॉवरलुम (वस्त्रोद्योग) चा पारंपारिक व्यवसाय असून मी त्यामध्ये देखील मदत करतो.

मालेगाव येथे पॉवरलुम यांची दि. पक्का रंग साडी को. ऑ. असोसिएशन अशी एक संस्था असून त्यामध्ये १००० पर्यत सभासद ठेवण्याची परवानगी आहे. माझे वडील श्री. अनिस अहमद कमाल अहमद हे दि. पक्का रंग साडी को. ऑ. असोसिएशन लि. मालेगाव चे शेअर होल्डर आहेत. सध्या दि. पक्का रंग साडी को. ऑ. असोसिएशन मध्ये ४३४ सभासद असल्यामुळे मालेगाव शहरातील पॉवरलुम सबंधित असणाऱ्या कुंटुबातील इतर ५०० सभासदानी नमुद संस्थेचे सभासदत्व मिळावे याकरीता सन २०२० मध्ये अर्ज केले होते. परंतु संचालक मंडळ, दि. पक्का रंग साडी को. ऑप. असोसिएशन लि. मालेगाव यांनी सर्व अर्ज फेटाळले. त्यामुळे आम्ही सर्व ५०० अर्जदारानी सामुहिक प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांच्याकडे अपिल अर्ज केला. परंतु सामुहिक अर्ज असल्यामुळे तो फेटळला व व्यक्तिगत अर्ज करू शकता असा निर्णय देण्यात आला.

सन २०२२ मध्ये मी दि. पक्का रंग साडी को. ऑप. असोसिएशन लि. मालेगाव या संस्थेचा सभासद होण्याकरीता व्यक्तिगत अर्ज प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांच्याकडे दिला. परंतु सदर अर्जावर लवकर निर्णय न घेण्यात आल्यामुळे मी व इतर २० अर्जदार यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक २३/१२/२०२२ रोजी रिट पिटीशन दाखल केले. सदर रिट पिटीशन ५९४/२०२३ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १८/०१/२०२३ रोजी प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग यांनी दिनांक ०४/०२/२०२३ पूर्वी संदरच्या अपिल अर्जावर योग्य तो निर्णय घ्यावा असे आदेश दिले.

श्री. अजितकुमार सासवडे, प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांनी माझे काका श्री. अतिक अहमद कमाल अहमद यांना फोन करून सांगितले की, तुमच्या बाजूने निकाल व कुंटुबातील इतर सभासदाना दि. पक्का रंग साडी को. ऑप. असोसिएशन लि. मालेगाव संस्थेचे सभासदत्व पाहिजे असेल तर मला भेटण्यास या असे सांगितले. त्यामुळे मी व माझे भाऊ श्री. मोहम्मद शिमान शफीक अहमद, माझे काका श्री. अतिक अहमद कमाल अहमद, व आमच्या काकाचा मित्र श्री. मोहम्मद युसुफ राणा असे त्यांना दिनांक २८/०१/२०२३ रोजी श्री. अजितकुमार सासवडे, प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांना हॉटेल अमेय, एमआयजी क्लब समोर, वांद्रे (पू), मुंबई येथे भेटलो.

सदरवेळी श्री. अजितकुमार सासवडे यांनी मला व माझा चुलत भाऊ श्री. शिमान यास बाहेर जाण्यास सागूंन माझ्या काका यांच्यासोबत अपीलासंदर्भात बोलणे सुरू केले परंतु काकांना उच्चरक्त दाबाचा त्रास असल्यामुळे काकां सोबत श्री. सासवडे साहेबांचे बोलणे झाले नाही तेव्हा सासवडे यांनी काकांना बाहेर जाण्यास सांगून मला एकटयाला बोलावून घेतले व मी व इतर लोकांनी दाखल केलेले अपीलावर निर्णय देण्यासाठी सर्वांच्यावतीने माझयाकडे एक कोटी दहा लाखांची रूपयांची मागणी केली तेव्हा त्यांच्यात व माझ्यात चर्चा होवून श्री. सासवडे साहेबांनी तीस लाख रूपये देण्याबाबत सांगून तुमच्या अपीलावर निकाल तुमच्या बाजूने लावतो असे संगितले त्यांनतर त्यांना मी संगितले की, वडिलांशी बोलतो त्यावेळी श्री. सासवडे साहेबांनी संगितले की, दि. ३१/०१/२०२३ रोजी सांयकाळी एम.आय.जी क्लब समोर अमेय रेस्टॉरंट येथे ऑफिस सुटल्यानंतर भेटण्यास सांगितले.

मला श्री. सासवडे साहेबांना लाच देण्याची इच्छा नसल्याने आम्ही दिनांक ३१/०१/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे मी दिनांक ३१/०१/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहिलो. त्यावेळी वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे पो.नि. पंकज शिंदे यांचेकडे श्री. अजितकुमार सासवडे, प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांचे विरुध्द मी सांगितल्यावरून माझ्या भाऊ शिमान याने त्याच्या स्वहस्ताक्षरात लिहली. पो.नि. पंकज शिंदे यांनी माझी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन सहायक पोलीस आयुक्त श्री. संजू जॉन यांची ओळख करून देवून ते सदर कारवाईकरिता पर्यवेक्षक अधिकारी असतील अशी माहिती दिली त्यानंतर त्यानी त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. व पो.नि. शिंदे हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. शिंदे यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले.

त्यानंतर सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करुन दिली त्यानतर मी, पंच, पोलीस पथकातील अधिकारी व अंमलदार असे शासकीय वाहनाने व आमच्यासोबत मी मालेगाव येथून आणलेल्या सीयाज कार क्र एम.एच.१५ जी.आर.०६९६ अशा मोटार कारने वरळी लाचलुचपत कार्यालय येथून श्री. सासवडे साहेबांनी संगितल्या ठिकाणी पडताळणीसाठी रवाना झालो. व शासकीय वाहन व मोटार कार ही गुरूनानक हॉस्पीटल, वांद्रे (पू), मुंबईच्या जवळ थांबलो.

मला व पंच श्री. शिवकुमार सोनवळे, श्रीमती उर्मिला धोतरे यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर तेथे मी श्री. अजितकुमार सासवडे यांना फोन करून भेटायचे असे सांगितले. त्यावेळी त्यांनी आम्हाला हॉटेल अमेय, एमआयजी क्लब, वांद्रे येथे १५ मिनिटामध्ये येतो असे सांगितले. त्यामुळे पो.नि. पंकज शिंदे यांनी दोन्ही पंच रिक्शाने हॉटेल अमेय येथे पाठविले. त्यानंतर तेथे माझे शर्टचे आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून लावून मी माझ्या सोबत आणलेल्या खाजगी वाहनाने ( मारूती सियाज एम.एच.१५ जीआर ०६९६) हॉटेल अमेय येथे भेटण्याकरीता गेलो.

हॉटेल अमेय येथे श्री. सासवडे साहेबाशी मी माझ्या कामानिमीत्त चर्चा केली सदरवेळी त्यांनी नमुद कामाकरीता माझ्याकडे रु ३०,००,०००/— इतक्या रक्कमेची मागणी करून रु १५,००,०००/— दिनांक ०१/०२/२०२३ रोजी सकाळी देण्याकरीता सांगितले त्यानंतर मी माझ्या खाजगी वाहनाने पुन्हा शासकीय वाहन थाबंले होते तेथे आलो थोड्या वेळाने तेथे दोन्ही पंच रिक्षाने तेथे आले.

पो.नि. पंकज शिंदे यांनी मला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करून त्यांचे ताब्यात घेतला व पो.नि शिंदे यांचे समक्ष माझ्याकडे आणि पंच यांचेकडे लोकसेवक व माझे प्रत्यक्ष भेटीत झालेल्या संभाषणाबाबत चौकशी केली असता मी वरील नमुद प्रमाणे माहिती दिली.

यातील माझे व लोकसेवक सासवडे यांचेतील संभाषण ऐकुन त्याबाबत ला.प्र.वि. कार्यालयात ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात येईल व त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. शिंदे यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

दि. ०१/०२/२०२३ रोजी १०.३० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय येथे मी व माझा भाऊ शिमान याच्यासह हजर झालो. त्यावेळी पो.नि. शिंदे यांनी सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिली. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. शिंदे हे

समक्ष

( पंकज शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

**श्री. मोहम्मद लुकमान अनिस अहमद यांचा दि. ०१/०२/२०२३ रोजीचा जबाब पुढे चालू**

मला व दोन्ही सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेले.
तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. शिंदे व दोन्ही पंचांचे वक्तव्य
ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला लोकसेवक अजितकुमार सासवडे यांना दयावयाचे रु.
१५,००,०००/– ( अक्षरी रु. पंधरा लाख फक्त ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता एवढी
रक्कम माझ्याकडे नसल्याचे त्यांना सांगितले व मी माझे कडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु.
५००/– दराच्या १०० अशा एकुण रु. ५०,०००/– (अक्षरी रु. पन्नास हजार) त्यांचेकडे दिले.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी त्यांचेकडील रू. २०००/– दराच्या खेळण्यातील बनावट नोटा रु.
११,५०,०००/– (अक्षरी एकरा लाख पन्नास हजार फक्त) एकुण ५७५ टॉय नोटा, रु ५००/– दराच्या
खेळण्यातील बनावट नोटा रु ३,००,०००/– (अक्षरी तीन लाख फक्त) एकुण ६०० टॉय नोटा,
असल्याचे सांगुन ते लाचेकरीता वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. नमुद वेळी मी दिलेल्या रू
५०,०००/– भारतीय चलनाच्या रु ५००/– दराच्या १०० ची झेरॉक्स काढण्यात येवुन त्याचेवरील
नोटांचे नंबर सापळा पथकातील अंमलदार यांचे मदतीने नोंद करण्यात आले.

त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी तेथे उपस्थीत असलेले पोलीस अंमलदार यांची ओळख पोलीस
अंमलदार कावले अशी करुन दिली. तसेच पोलीस अंमलदार कावले यांनी अॅथ्रासीन पावडरचे गुणधर्म
समजावून सागितले. व त्याबाबतचे प्रात्याक्षिक देखिल दाखविले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांचे सुचनेनुसार तेथे
हजर असलेले पोलीस अमंलदार कावले यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अॅथ्रासीन पावडर लावली.
त्यानंतर सदर लाचेची रक्कम नोटरी ऑफिस, टेन्शन चौक, मालेगाव असे मराठीत एका बाजूला व दुसऱ्या
बाजूला ऊर्द भाषेत लिहलेल्या हिरव्या रंगाची कापडी पिशवीमध्ये ठेवली. नमुद पिशवीच्या दोन्ही बाजुस श्री
कावले यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर सदरची पिशवी कावले यांनी माझ्या हातात देऊन, ते
सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले.

नमुद वेळी पोनि शिंदे यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाचे दक्षतेबाबत मला तसेच पंचाना
माहिती दिली. लोकसेवक सासवडे हे जर माझ्या गाडीमध्ये बसले व त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली तर
गाडीचा चालक श्री. वाहिद अख्तर हे गाडीची पार्किंग लाईट चालू करतील. जर लोकसेवक यांनी जर मला
त्यांच्या वाहनामध्ये बसण्यास सांगितले आणि त्या वाहनामध्ये किंवा लोकसेवक यांच्या कार्यालयात लाचेची
रक्कम स्विकारल्यास उजवा हात डोक्यावरून फिरवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे मला सांगितले.

त्यानंतर पोलीस पथकातील पोलीस अमंलदार जावेद व पो.नि. शिंदे, पो. अमंलदार परब व
सपोआ जॉन, आणि पोलीस अमंलदार मिंडे व पंच श्री. सोनवळे हे त्यांच्या दुचाकी वाहनासह पूना स्ट्रीट,
मस्जिद बंदर कार्यालयात कोणासही संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा
मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील तर उर्वरित सापळा पथक व पंच श्रीमती धोतरे या शासकीय
वाहनासह पी.डी.मेलो रोडवर थाबंतील असे पो.नि. शिंदे यांनी सांगितले.

त्यानंतर मी, दोन सरकारी पंच, पो.नि. शिंदे, स.पो.आ. संजू जॉन व सापळा पथक असे
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील सर्व आवश्यक ती कारवाई झालेनंतर लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग येथुन श्री. सासवडे साहेब यांनी संगितल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयाच्या जवळ रवाना झालो.

त्यानंतर सदर वाहने सरपोचखानवाला रोडने, सातरस्ता मार्गे, पुना स्ट्रीटवरील हॉटेल रूपेश जवळ
थांबविण्यास सांगितले. सदर ठिकाणी मी लोकसेवक सासवडे यांनी माझ्या मोबाईल क्रमांक
९५९५२८१७०० वरून लोकसेवक सासवडे यांचे मोबाईल क्रमांक ९८६९३४१९६२ वर फोन करण्यात

समक्ष
[signature]
( पंकज शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

[signature]

**श्री. मोहम्मद लुकमान अनिस अहमद यांचा दि. ०१/०२/२०२३ रोजीचा जबाब पुढे चालू**

आला. सदरचा कॉल हा डीव्हीआर चे सहाय्याने ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे. नमुद संभाषणा दरम्यान लोकसेवक सासवडे यांनी कार्यालयाच्या खालीच थांबण्यास सांगून ते स्वत: खाली येत असल्याचे सांगितले. त्यामुळे पो.नि .शिंदे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टचे आतील बाजूस लावला त्यानंतर काही वेळातच लोकसेवक सासवडे हे त्यांचे वाहन क्र. एम.एच. ४३ बीडी ९९५१ या वाहनाने माझ्या समोरून गेले. व त्यांनी मला मोबाईल वर फोन करून कुठे आहे असे विचारले त्याचेळी मी मागे गाडीत आहे असे सांगितले त्यांनी पुढे येण्यास सांगितल्यामुळे मी माझ्या वाहनामधून उतरून ते ज्या दिशेने गेले त्या दिशेने निघालो.

लोकसेवक सासवडे यांचे वाहन माझ्या वाहनापासून अंदाजे १०० मीटर अतंरावर एका शौचालयाच्या जवळ थाबंल्यावर मी नमुद वाहनामध्ये बसलो. त्यावेळी आम्ही माझ्या कामाबद्दल आणि लाचेच्या रक्कमेबद्दल चर्चा केली व त्यांनी त्यावेळी मी त्यांच्या हातात रु १५,००,०००/— लाचेची रक्कम दिली.

त्यानंतर मी नमुद वाहनामधून उतरून सापळा पथकास दिसेल अशा पद्धतीने उजवा हात डोक्यावरून फिरवून पुर्वनियोजीत इशारा असता सापळा पथकातील अंमलदार यांनी लोकसेवक सासवडे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला लावण्यात आलेला व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला.

लोकसेवक श्री. अजितकुमार सासवडे, प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई यांनी आमच्या अपिल अर्जावर माझ्या बाजूने निकाल देणे तसेच दि. पक्का रंग साडी को. ऑप. असोसिएशन लि. मालेगाव संस्थेचा सभासद करून घेण्याकरीता अप्रामाणिकपणे रु ३०,००,०००/— इतक्या लाचेची मागणी करून रु. १५,००,०००/— ( अक्षरी रु. पंधरा लाख फक्त) इतक्या रक्कमेचा लाचेचा गैरलाभ म्हणुन स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, लोकसेवक श्री. अजितकुमार सासवडे यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीत समजावून सांगितली. ती मी वाचून पाहिली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( पंकज शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Md. Luqman Anees Ahmad
01/02/2023

(११)

95811

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..........
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी आलोसे यांच्या कार्यालयात दाखल केलेले अपील अर्जाचे (निकाल दिनांक ०४।०१।२३ रोजी पर्यंत देणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेश केला होता. यामुळे फिर्यादी अपील अर्जाचा कायदेशीर निकाल देण्याकरीता आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडून रु. ३० लाख इतक्या रकमेची मागणी करून त्यापैकी अर्धी रक्कम रु. १५ लाख घेताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून कलम ७, भ. प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पंकज शिंदे पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. ..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., 
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name पंकज शिंदे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ८।२।२०२३
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**